**२३९. परवानगीवाचून रस्ते न खोदणे किंवा न फोडणे किंवा त्यावर बांधकामाची सामग्री न ठेवणे.—**

(१) आयुक्त किंवा नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी सोडून अन्य कोणत्याही व्यक्तीने आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून किंवा अन्य कायदेशीर प्राधिकारावाचून—

(अ) कोणत्याही रस्त्याचा भाग असणारी माती किंवा फरसबंदी किंवा कोणतीही भिंत, कुंपण, खांब, साखळी किंवा अन्य सामान किंवा वस्तू खोदता, फोडता, काढता, घेता किंवा तीत कोणताही फेरफार करता किंवा तिची कोणत्याही प्रकारे खराबी करता कामा नये;

(ब) कोणत्याही रस्त्यात बांधकामाची कोणतीही सामग्री ठेवता कामा नये; किंवा

(क) कोणत्याही रस्त्यात कोणत्याही प्रकारच्या कामाच्या प्रयोजनासाठी कोणतीही परांची किंवा कोणतीही तात्पुरती उभारणी उभारता कामा नये किंवा कमावलेला चुना तयार करण्यासाठी किंवा विटा, चुना, कचरा किंवा अन्य सामान ठेवण्यासाठी अशा रस्त्यात कोणतेही खांब, कांबी, कठडे, फळ्या किंवा अन्य वस्तू लावून कोणत्याही जागेला कुंपण घालता कामा नये.

(२) पोट-कलम (१), खंड (ब) किंवा (क) अन्वये दिलेली कोणतीही परवानगी आयुक्तास आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, ज्या व्यक्तीस अशी परवानगी देण्यात आली होती तिला त्याने निदान चोवीस तासांची लेखी नोटीस दिल्यावर समाप्त करता येईल.

(३) ज्या बाबतीत बांधकाम सामग्री कोणत्याही रस्त्यात ठेवण्यासाठी पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये परवानगी मिळण्याकरिता अर्ज करण्यात आला असेल आणि अर्जाच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत अर्जदारास कोणतेही उत्तर पाठविण्यात आले नसेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत जी कोणतीही बांधकाम सामग्री किंवा कोणतीही परांची किंवा कोणतीही तात्पुरती उभारणी किंवा कुंपणाच्या रूपाने जे कोणतेही खांब, कांबी, कठडे, फळ्या किंवा अन्य वस्तू पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परवानगीवाचून किंवा प्राधिकारावाचून कोणत्याही रस्त्यात ठेवण्यात किंवा उभारण्यात आल्या असतील किंवा ज्या अशा परवानगीने किंवा प्राधिकारानुसार ठेवण्यात किंवा उभारण्यात येऊन पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत काढून टाकण्यात आल्या नसतील त्या नोटीस न देता काढून टाकण्याची व्यवस्था आयुक्तास करता येईल.

**२४०. ज्यांना कलम २३९ अन्वये परवानगी दिली असेल त्या व्यक्तींनी सार्वजनिक सुरक्षिततेसाठी बाळगावयाची सावधगिरी.—**

ज्या व्यक्तीस कलम २३९ अन्वये कोणतीही परवानगी दिली आहे अशा प्रत्येक व्यक्तीने आपल्या स्वतःच्या खर्चाने, जेथे माती किंवा फरसबंदी खोदण्यात किंवा फोडण्यात आली असेल किंवा जेथे कोणतीही बांधकाम सामग्री ठेवण्यात आली असेल किंवा कोणतीही परांची उभारणी किंवा अन्य वस्तू उभारण्यात आली असेल त्या जागेस योग्य रीतीने कुंपण घालण्याची व तिची राखण करण्याची व्यवस्था केली पाहिजे, आणि अपघात टाळण्यासाठी दिवाबत्ती करणे आवश्यक असेल अशा सर्व बाबतींत अशा जागी रात्रीच्या वेळी चांगल्या प्रकारे दिवाबत्ती करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**२४१. कलम २३९ अन्वये परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तींनी रस्ते इत्यादी पूर्ववत केलेच पाहिजेत.—**

(१) ज्या व्यक्तीस कलम २३९ अन्वये कोणत्याही रस्त्याची माती किंवा फरसबंदी खोदण्याची किंवा फोडण्याची परवानगी देण्यात आली असेल किंवा जी व्यक्ती अन्य कायदेशीर प्राधिकारानुसार कोणत्याही रस्त्याची माती किंवा फरसबंदी खोदील किंवा फोडील अशा प्रत्येक व्यक्तीने ज्या कामासाठी ती खोदण्यात किंवा फोडण्यात

Scanned with CamScanner

आली असेल ते काम शक्य तितक्या त्वरेने पुरे केले पाहिजे आणि आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने विलंब न लावता अशी जमीन भरली पाहिजे व खोदलेला किंवा फोडलेला रस्ता किंवा फरसबंदी पुन्हा बसविली पाहिजे व पूर्वी होती तशी करून दिली पाहिजे.

(२) जर उक्त व्यक्तीने पूर्वी सांगितल्याप्रमाणे असा रस्ता किंवा फरसबंदी पुन्हा बसविण्यात व पूर्वी होती तशी करून देण्यात कसूर केल्यास, आयुक्तास, असा रस्ता किंवा फरसबंदी पूर्ववत करता येईल, आणि असे करण्यासाठी त्यास आलेला खर्च उक्त व्यक्तीने दिला पाहिजे.

**२४२. कलम २३९ अन्वये परवानगी दिलेल्या व्यक्तींनी वाहतूक इत्यादींसाठी करावयाची तरतूद.–** ज्या व्यक्तीस कलम २३९ अन्वये कोणत्याही रस्त्याची माती किंवा फरसबंदी खोदण्याची किंवा फोडण्याची परवानगी देण्यात आली असेल किंवा जी व्यक्ती कोणत्याही अन्य कायदेशीर प्राधिकारानुसार कोणतेही काम करण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही रस्त्याची माती किंवा फरसंबंदी खोदील किंवा फोडील अशा कोणत्याही व्यक्तीस, आयुक्त लेखी नोटिशीद्वारे वाहतूक चालू राहण्यासाठी किंवा तिचा मार्ग वळविण्यासाठी अशा रस्त्यातून ज्या जागांकडे जाता येते त्या जागांकडे जाण्यायेण्यासाठी, आणि उक्त काम चालू केल्यामुळे ज्या कोणत्याही जलनिःसारणाच्या पाणीपुरवठ्याच्या किंवा दिवाबत्तीच्या साधनांच्या बाबतीत अडथळा येईल त्यासाठी आपले समाधान होईल अशा रीतीने तरतूद करण्याविषयी फर्मावू शकेल.

**२४३. रस्त्यांच्या कोपऱ्यांवरील इमारती.–**

(१) आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने, लेखी आदेश देऊन, जी इमारत अगोदरच बांधण्यात आली असेल किंवा नव्याने बांधावयाची असेल किंवा पुन्हा बांधावयाची किंवा दुरुस्त करावयाची असेल व जी दोन किंवा अधिक रस्ते ज्या ठिकाणी मिळतात अशा ठिकाणी असेल अशा कोणत्याही इमारतीचा कोपरा वर्तुळाकार करण्याविषयी किंवा तो ठरवील अशा उंचीपर्यंत व अशा रीतीने तो तिर्यक करण्याविषयी फर्माविता येईल आणि अशा आदेशात अशा इमारतीच्या अंगभूत जागेत आवाराची भिंत, कुंपण किंवा वई किंवा अन्य कोणतेही बांधकाम बांधण्यासंबंधी किंवा कोणतेही झाड लावण्यासंबंधी किंवा ते तेथे राहू देण्यासंबंधी त्यास आवश्यक वाटतील अशा शर्ती घालता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशामुळे झालेल्या कोणत्याही हानी किंवा नुकसानीबद्दल आयुक्ताने भरपाई दिली पाहिजे.

## [1][वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे यांसाठी करावयाची तरतूद]

**२४३-अ. वाहने उभी करून ठेवण्याचा किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे व त्यासंबंधातील फी किंवा शुल्क यांसाठी करावयाची तरतूद.–**

(१) आयुक्तास, पोलीस आयुक्ताशी किंवा पोलीस आयुक्त नसेल त्याबाबतीत महानपालिका क्षेत्रातील पोलीस अधिकाऱ्यांच्या अधिकारश्रेणीमध्ये सर्वात वरिष्ठ दर्जा असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याशी विचारविनिमय केल्यानंतर, वेळोवेळी, सार्वजनिक रस्त्याच्या किंवा सार्वजनिक जागेच्या कोणत्याही भागामध्ये त्याला योग्य वाटतील अशा जागी वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे म्हणून राखून ठेवता येतील.

(२) आयुक्तास, महानगरपालिकेच्या संमतीने, त्याला योग्य वाटतील अशा अटी व शर्ती यांच्या अधीन राहून,

Scanned with CamScanner